आर.सी.सी. क्र.२८१/२०२२

नि.क्र. २०४ लगत जोड

(आरोपीस जेल प्रशासनाने आज प्रत्यक्ष हजर केले नाही. सदर आरोपीची हजेरी ही व्ही.सी.द्वारे नोंदवण्यात आलेली आहे. सदर आरोपीचे वकील न्यायालयात हजर असुन आरोपी व्ही.सी.द्वारे सदर केसमधील न्यायालयीन कामकाजात हजर आहे.)

(सदर साक्षीदार हस्ताक्षर तज्ञ असुन ते पुणे जिल्हा व सत्र न्यायालय येथे व्हीसीद्वारे हजर असुन त्यांचा पुरावा व्हीसीद्वारे नोंदवण्यात येत आहे. सदर व्हीसी रुममध्ये सदर साक्षीदार व कॉर्डीनेटर हजर असुन सदर पुरावा हा गुगलमिट सॉफटवेअरद्वारे नोंदवण्यात येत आहे व सदर व्हीसी रुममध्ये साक्षीदार आणि कॉर्डीनेटर यांच्या व्यतिरीक्त कुणीही हजर नसल्याबाबत खात्री केली आहे. तसेच सदर व्हीडीओ व ऑडीओ क्वॉलीटी क्लीअर असुन कनेक्टीव्ही संदर्भात काहीही अडचण दिसुन येत नाही.)

**<u>सरकार पक्षातर्फे साक्षीदार क्र. २० यांचा पुरावा</u>**

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

माझे नांव – प्रकाश पोपट पवार

वय –३९ वर्षे, व्यवसाय – दस्तावेज परिक्षक, मुख्य शासकिय दस्तावेज परिक्षक पुणे .

राहणार–

**<u>सरतपासणी सहा. सरकारी अभियोक्ता श्री.आर.एस.पटेकर यांचेमार्फत</u>**–

सप्टेबर २०१८ पासुन मी गुन्हे अन्वेशण विभाग येथे सहाय्यक शासकीय दस्तऐवज परिक्षक म्हणून कार्यरत आहे. त्याबाबत मला डी.वाय मंडलीक साहेब यांचा आदेश होता. त्यासंदर्भात दस्तऐवज परिक्षणासाठी माझी एक वर्षाची ट्रेनिंग झाली आहे. त्यासंदर्भात मला आय.डी कार्ड मिळाले असून माझी असीस्टंट स्टेट एक्सामायनर ऑफ डॉक्यूमेंटस म्हणून पोस्ट आहे. मी जवळपास पाच हजार प्रकरणांमध्ये हस्ताक्षर तज्ञ म्हणुन काम पाहिले आहे. मी पंधरा वीस प्रकरणांमध्ये साक्ष दिली आहे. मला या केससंदर्भात दि.३१/०१/२०२३ पारनेर पोलीस स्टेशनचे पत्र आले होते. गु.र.नं १८०/२०२१ होता व भा.द.वी कलम ४०६, ४०८, ४२० इ. कलम होते. माझ्या कार्यालयाकडे तीन सीलबंद पाकीट प्राप्त झाले होते. पोलिसांनी दस्तऐवजांची तपासणी होउन त्याबाबतचा अहवाल होउन मिळणेची विनंती केली होती. तीन सिलबंद पाकीट आमच्या कार्यालयाकडे चांगल्या स्थितीत मिळाले होते. सर्वप्रथम तपासी अधिकारी

(P. P. Pawar)
A.S.E.D,
C.I.D, Pune

यांनी दिलेल्या लिस्ट प्रमाणे सगळी कागदपत्रे नीट आहेत का याची पडताळणी केली. आता मला आमच्या कार्यालयाकडे अहवाल मागवण्यासंदर्भात पोलिसांनी दिलेले पत्र मला दाखवण्यात आले ते तेच असून त्याची प्रत माझ्याकडे आहे. त्यास **नि.२०५** देण्यात येते. मला गौतम जाधव, विद्या उघडे, संकेत कांबळे, भुषण संखे, प्रकाश बोरुडे व आनंद रंगारी यांचे स्पेसीमन व नॅचरल सहया प्राप्त झाले होते. Q1 व Q2 वर सुखदेव भाऊ पवार यांची ११२२१२ नंबर असलेली ठेव पावती आहे. ती पावती लाल रंगाची असुन त्यावर लाल पेनाने वर्तुळ आकार केला होता. तसेच Q3 व Q4 वर तुकाराम कोंडीबा तिकोणे यांची पावती क्र.११२२२० आहे. ती पावतीसुध्दा लाल रंगाची असुन तिला लाल पेनाने वर्तुळ केलेला होता. Q5 व Q6 ही पावती रंजना दत्तात्रय मोरे यांची होती तिचा क्र.११२२७६ आहे. ती पावतीसुध्दा लाल रंगाची असुन तिला लाल पेनाने वर्तुळ केलेला होता. N1 ते N6 वरील सहया आरोपी गौतम वसंत जाधव याच्या होत्या. N7 ते N12 साक्षीदार प्रकाश बळवंत बोरुडे यांच्या सहयाहोत्या. N13 ते N18 वरील सहया विद्या उघडे यांच्या होत्या. N19 ते N24 वरील सहया संतोष विश्वास कांबळेयांच्या होत्या. N25 ते N30 वरील सहया भुषण संखे यांच्या होत्या. S1 ते S42 वरील सहया गौतम वसंतजाधव यांच्या होत्या. S43 ते S84 वरील सहया प्रकाश बोरुडे यांच्या होत्या. S85 ते S126 वरील सहया विद्या उघडे यांच्या होत्या. S127 ते S168 वरील सहया संतोष विश्वास कांबळे यांच्या होत्या. S169 ते S210 वरील सहया भुषण संखे यांच्या होत्या.

ज्यावेळेस या सर्व सहया मला प्राप्त झाल्या त्यावेळी त्या सर्व सहया मला स्पष्ट स्वरुपात दिसत होत्या व त्यामुळे त्या तपासणीसाठी मला सोप्या होत्या. तपासणीसाठी आम्ही साईड बाय साईड प्रक्रियेचा अवलंब करतो. अंतिम परिक्षण करण्यासाठी मी एकुण ३ सिटींग दिल्या होत्या. त्यासाठी आधी प्राथमिक चौकशी केली होती. प्रिमीलीनरी स्टेजला आम्ही तपासी अधिकारी यांनी दिलेल्या लीस्टप्रमाणे कागदपत्र तपासतो. त्यानंतर डॉक्युमेंटस प्रॉपर आहेत का व सफिशियंट आहे का याची खात्री करतो. त्यानंतर ग्रिन पेनने कागदपत्रांवर मार्कींग करतो.क्वेश्चन्ड डॉक्युमेंटला Q1 ते Q6 अशी मार्कींग केली. स्पेसीमन डॉक्युमेंटला S1 ते S210 अशी मार्कींग केली. स्पेसीमन सहयांना आम्ही S मार्क करतो व नॅचरल सहयांना आम्ही N मार्क करतो. सेकंड स्टेजला आम्ही कंपॅरीजन करतो व त्यामध्ये characteristics चेक करतो. सायंटीफीक डिव्हाइसमध्ये तपासणीसाठी आम्ही अल्ट्रालेन्स, हॅंड मॅगनीफायर,

स्टेरीओस्कोपीक मायक्रोस्कोप वापर करतो. तपासणीसाठी आम्ही स्ट्रोक्स चेक करतो, जनरल राइटींग हॅबीटस व इंडीव्हीज्युयल राइटींग हॅबीटस चेक करतो. तपासणीसाठी अल्बर्ट ऑसबॉर्न यांच्या पुस्तकाचा वापर करतो. तपासणीसाठी सुरुवातीला आम्ही कच्च्या नोटस काढतो.

न्यायालयाची वेळ संपल्यामुळे सरतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब.

| रिमोट पॉइंट कॉर्डीनेटर | साक्षीदार | संबंधीत न्यायदंडाधीकारी यांची सही |
|---|---|---|
| 01/12/25<br>एरप्पा सातप्पा गुरव | प्रकाश पोपट पवार<br>सहा.शासकीय | Digitally signed by NILESH SHRIPAL SABNIS<br>NILESH SHRIPAL SABNIS<br>Date: 2025.12.01 18:07:51 +0530<br>(डॉ.एन.एस.सबनीस) |
| कनिष्ठ लिपीक<br>संगणक विभाग, पुणे | दस्ताऐवज परिक्षक,<br>सीआयडी, पुणे | न्यायदंडाधिकारी, प्रथमवर्ग,<br>कोर्ट नं.२, पारनेर.<br>दि. ०१/१२/२०२५ |

श्रवणोत्तर स्वीकृती

Digitally signed by NILESH SHRIPAL SABNIS
NILESH SHRIPAL SABNIS
Date: 2025.12.01 18:07:59 +0530

दिनांकः ०१/१२/२०२५.

(डॉ.एन.एस.सबनीस)
न्यायदंडाधिकारी, प्रथमवर्ग, कोर्ट नं.२, पारनेर.

(P. P. Pawar)
A.S.E.D.
C.I.D., Pune